# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर


क्र : मविनिआ/माअअ/34/2018/038 दि. 11.06.2018

प्रति,
श्री. विठ्ठलराव गायकवाड,
भारत कुंज बिल्डिंग, 2 रा मजला,
व्ही.एन.देसाई हॉस्पीटल जवळ,
दिनकर पटेल उद्यान समोर, 6 वा रस्ता,
सांताक्रुझ (पुर्व), मुंबई- 400 055.

विषय :- आपला दि. 14.05.2018 रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. 14.05.2018 रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 6 (1) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. 14.05.2018 रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

1. बी.एस.ई.एस ही मुंबई उपनगर वीज कंपनीचे हस्तांतर सन 2003 साली रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनी लिमीटेड असे झाले त्या हस्तांतर कराराची प्रत मिळावी.
3. सन 2003 साली श्री. अनिल अंबानी यांच्या रिलायन्स एनर्जी कंपनीचे किती प्रामाणात शेअर्स खरेदी केले होते. व संपुर्ण स्थावर मालमत्तेचे हस्तांतर रिलायन्स एनर्जी कंपनीकडे म्हणजेच सध्याच्या रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनीकडे आले त्याची सविस्तर माहिती मिळावी.

<u>उत्तर</u> :- वरिल परिच्छेद 1 व 3 ला अनुसरुन कळविण्यात येते की, सन २००३ साली बी.एस.ई.एस लिमिटेडच्या रिलायन्स एनर्जी लिमिटेड कडे हस्तांतरण करण्यासंदर्भात आयोगाच्या मान्यतेसाठी कोणतीही याचिका दाखल करण्यात आली नसल्याचे आयोगाच्या अभिलेखानुसार दिसून येत नाही.

तथापि बी.एस.ई.एस लिमीटेडच्या विज वितरण परवाना रिलायन्स एनर्जी लिमिटेडला हस्तांतरित न झाल्याबद्दल, बी.एस.ई.एस च्या 8 सप्टेंबर 2003 साली दाखल झालेल्या विज दर मंजुरीच्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान हरकत उपस्थित झाली होती. त्यावरील आयोगाने पुढील निर्देश दिले.

7.3 Commission Ruling

The Commission notes that the MERC change in name in terms of the provision of the companion Act, 1956 has no other legal implication and that, the entity remaining otherwise the same, no fresh issue of the License by the Commission is required under the provision of the Electricity Act, 2003.

सदर प्रकरणाचा (प्रकरण क्र.2003 चे 18) आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तसेच, 2011 साली आयोगाने रिलायन्स इन्फ्रास्टक्चर यांना प्रकरण क्र.2011 चे 65 मध्ये वितरण परवाना मंजूर केला. त्यासंदर्भातील फाईल्स तसेच आयोगाने बनविलेल्या वितरण परवाना विनियमा संदर्भातील (Distribution License Regulation) इतर फाईल्स आयोगाच्या रेकॉर्ड रुममध्ये निरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

2. रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनी लिमीटेड यांच्या मुंबई उपनगर वीज वितरण क्षेत्र व डहाणु वीज निर्मिती प्रकल्पाचे किती प्रमाणात शेअर्स अदानी यांच्या वीज कंपनीला विकले जाणार आहेत त्याची माहिती मिळावी.

4. रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनीची विक्री अदानी या उद्योगपतीला केली जात असल्यामुळे किती टक्के प्रमाणात शेअर्स विकले जाणार आहेत. रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनीच्या मालमत्तेचे 100 टक्के हस्तांतर केले जाणार आहे का? त्याची संपूर्ण माहिती मिळावी.

**उत्तर :-** वरिल परिच्छेद 1 व 3 ला अनुसरुन असे कळविण्यात येते की, रिलायन्स इन्फ्रास्टक्चर यांनी त्यांचा विज वितरण व विज पारेषण परवाना हस्तांतर करण्यासाठी आयोगाकडे प्रकरण क्र. २०१७ चे १३९ व प्रकरण क्र. २०१७ चे १४० मध्ये याचिका दाखल केल्या आहेत. सदर याचिकांवर दिनांक. १४ जून, २०१८ रोजी जनसुनावणी होणार आहे. विद्युत अधिनियम २००३ व त्याअंतर्गत बनविण्यात आलेल्या विनिमयांनुसार आयोग याबाबत निर्णय घेईल. सदर याचीकांची प्रत रिलायन्स इन्फ्रास्टक्चर कंपनीच्या कार्यालयात तसेच त्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(अधिक माहितीसाठी जनसुनावणीची नोटीस सोबत जोडली आहे).

त्यानुसार आपणांस कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्याची मुभा देण्यात येत आहे. कार्यालयातील अभिलेख्यांचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात येण्याअगोदर कार्यालयास अवगत करावे. तसेच सदर अभिलेख्यांमधील आपणांस आवश्यक असलेल्या दस्तऐवज/पत्रांची छायांकित प्रती आपणांस उपलब्ध करून देण्यात येतील.

सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत प्रथम अपिल करु शकता.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी